पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – २१

**सभावृत्तांत**

दिनांक - **१०/०४/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **मंगळवार** दिनांक **१०/०४/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सागर बाळासाहेब गवळी - सभापती**
२. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे - उपसभापती
३. मा.कदम शशिकांत गणपत
४. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
५. मा.गीता सुशिल मंचरकर
६. मा.वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.४) मौजे बोपखेल येथील स.नं.१४८ पै. आ.क्र.२/१५४ खेळाचे मैदानाने बाधीत क्षेत्र आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबत – मा.विकास डोळस, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **१३/०३/२०१८ व २७/३/२०१८** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.२०)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ५८ विषय क्रमांक - ०१
दिनांक - १०/०४/२०१८ विभाग – नगररचना व विकास
सुचक : मा.शैलेश मोरे अनुमोदक : मा.विकास डोळस
संदर्भ: मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७३/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय - मौजे किवळे येथील स.नं.३९ ते ७१ येथील मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रस्त्याखालील क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५९ विषय क्रमांक - ०२

दिनांक - १०/०४/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.अश्विनी वाघमारे अनुमोदक : मा.विकास डोळस

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७४/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय : मौजे किवळे येथील स.नं. ७३, ७४, ७५ व ७६ येथील मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याखालील क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६० विषय क्रमांक - ०३

दिनांक - १०/०४/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.शैलेश मोरे अनुमोदक : मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१३/५४/२०१५, दि.११/०५/२०१५

विषय : पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व १४ पै. मधील २४ व १२ मी. रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे क्षेत्र भूसंपादनाबाबत.

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक - ६१ विषय क्रमांक - ०४

दिनांक - १०/०४/२०१८

सुचक : मा.विकास डोळस अनुमोदक : मा.शैलेश मोरे

संदर्भ : मा.विकास डोळस, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

मौजे बोपखेल येथील स.नं.१४८ पै. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आ.क्र.२/१५४ खेळाचे मैदान हे आरक्षण असून सदर बाधीत आरक्षणामध्ये लोकांची घरे तसेच त्यांचे वहिवाटीचे रस्ते आहेत. सदरचे आरक्षण विकसित झालेस अनेक लोक भूमीहिन तसेच बेघर होतील. सद्यस्थितीत बोपखेलमध्ये स.नं.१ मध्ये आ.क्र.२/१६७ खेळाचे मैदान हे आरक्षण विकसित करण्याची कार्यवाही चालू असल्याने आ.क्र.२/१५४ खेळाचे मैदान या आरक्षणाची गरज भासत नाही. तरी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये आ.क्र.२/१५४ खेळाच्या मैदानाने बाधीत क्षेत्र आरक्षणातून वगळून रहिवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सागर बाळासाहेब गवळी)**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१७८/२०१८
दिनांक : १०/०४/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.